Municipal Council after following all the procedure as laid down under sub-section (1) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act') submitted to the Government of Maharashtra the proposal of modification to the sanctioned Development Plan of Ashta (hereinafter referred to as the 'said Development Plan') with a view to delete the land bearing CTS No. 4445 (Part) from Site No. 28 'Girls' School and reserve the same for Sant Dnyaneshwar Shikshan Sanstha, as Site No. 28-A " Ashram Shala and Boys Hostel" under its letter dated 21st January 1999;

And whereas, the Government of Maharashtra after making necesary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is satisfied that the proposed modifition in necessary and should be sanctioned;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra, hereby sanctions the proposed modification to the said Development Plan and for that purpose amends the Government Notification No. TPS-2080/844/B/UD-7, dated 30th June 1982, as follows; viz. In the said notification, after the last entry the following new entry shall be added, namely :—

The land bering CTS No. 4445 (Part) as shown in Orange colour on the part plan is deleted from Site No. 28-"Girls' School" and reserved for Sant Dnyaneshwar Shikshan Sanstha as Site No 28-A "Ashram Shala and Boys' Hostel".

Note.—The aforesaid part plan showing the sanctioned modification as above, is available for inspection of the public during office hours on all working days in the office of the Municipal Council, Ashta.

By order and in the name of the
Governor of Maharashtra.

RAJAN A. KOP,
Under Secretary to Government.

---

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १७ फेब्रुवारी १९९९

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस–२०९७/अनौ.-१८७/९७/नवि–१३.—ज्याअर्थी, आष्टा शहराची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) राज्य शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्णय क्रमांक टीपीएस–२०८०/८४४/(ब)/नवि–७, दिनांक ३० जून १९८२ अन्वये मंजूर केली असून दिनांक १ ऑक्टोबर १९८२ पासून अंमलात आली आहे व त्यानुसार आष्टा येथील सि. स. क्र. ४४४५ (भाग) ही जमीन (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली) आरक्षण क्रमांक २८ "गर्ल्स स्कूल" या आरक्षणामध्ये समाविष्ट केलेली आहे.

आणि, ज्याअर्थी, आष्टा नगर परिषदेने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील पत्र क्रमांक टीपीएस–२०९७/अनौ.-१८७/९७/नवि–१३, दिनांक १३ जुलै १९९८ अन्वये दिलेल्या निर्देशास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेखिलेला) चे कलम ३७ (१) अन्वये आष्टा शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधिलेली) आरक्षण क्रमांक २८ "गर्ल्स स्कूल" या आरक्षणामधून सि.स.क्र. ४४४५ (भाग) ही जागा वगळून सदर जागा संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेकरिता आरक्षण क्रमांक २८–अ "आश्रमशाळा व मुलांचे वसतिगृह" म्हणून आरक्षित करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेखिलेला) सर्व त्या कायदेशीर तरतुदींची पूर्तता करून महाराष्ट्र शासनास दिनांक २१ जानेवारी १९९९ रोजी सादर केलेला आहे;

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (२) च्या अनुषंगाने संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला मसलत करून व इतर योग्य ती चौकशी केल्यानंतर उक्त फेरबदल मंजूर करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झालेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (२) अन्वये प्राप्त झालेल्या शक्तीस अनुसरुन महाराष्ट्र शासन उक्त फेरबदलास मान्यता देत आहे व त्यासाठी नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्रमांक टीपीएस–२०८०/८४४/(ब)/नवि–७, दिनांक ३० जून १९८२ मधील बदल दर्शविणाऱ्या सूचीमध्ये खालील नवीन बदल समाविष्ट करीत आहे.

"आरक्षण क्रमांक २८ 'गर्ल्स स्कूल' या आरक्षणामधील सि. स. क्रमांक ४४४५ (भाग) ही जागा वगळून सदर जागा 'संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेकरिता' आरक्षण क्रमांक २८–अ नुसार "आश्रमशाळा व मुलांचे वसतीगृह" म्हणून आरक्षित करण्यात येत आहे. हा फेरबदल उक्त विकास योजनेच्या भाग नकाशात नारिंगी रंगाने दर्शविण्यात आलेला आहे.

टीप.—मंजूर विकास योजनेमध्ये वरील बदल दर्शविणारा भाग नकाशा आष्टा नगर परिषदेमध्ये कार्यालयीन दिवशी कामकाजाच्या वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजन अ. कोप,
शासनाचे अवर सचिव.

**PART PLAN SUBMITTED TO GOVERNMENT FOR AUTHENTICATION**